अन्नं बहु कुर्वीत
तद् व्रतम्

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

# ई वार्ता

## सप्टेंबर २०२२




मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २४९२/२०२२

मफुकृवि ई वार्ता
सप्टेंबर २०२२

वर्ष :२, अंक क्रं. : २१, सप्टेंबर, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## कुलगुरूपदी निवड झाल्याबद्दल डॉ. शरद गडाख यांचा सत्कार समारंभ संपन्न



**दि. २० सप्टेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे संशोधन व विस्तार शिक्षण संचालक या पदावर कार्यरत असणारे डॉ. शरद गडाख यांची अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाच्या कुलगुरूपदी निवड झाली. कुलगुरूपदी निवड झाल्याबद्दल विद्यापीठाच्या वतीने त्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील होते. या प्रसंगी सत्कारमूर्ती संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे, नियंत्रक डॉ. बापूसाहेब भाकरे, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, डॉ. श्रीमंत रणपिसे, डॉ. मिलिंद अहिरे उपस्थित होते. यावेळी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील म्हणाले की डॉ. शरद गडाख यांनी संशोधन व विस्तार शिक्षण संचालक पदावर काम करताना विद्यापीठाला एका वेगळ्या उंचीवर नेले. त्यांचा वक्तशीरपणा, कामाचे नियोजन, प्रचंड व निरंतर मेहनतीची तयारी यासारख्या चॅम्पियन बनवणाऱ्या गुणांनीच त्यांना कुलगुरूपदी पोहोचविले.

सत्काराला उत्तर देताना डॉ. शरद गडाख म्हणाले की राहुरी कृषि विद्यापीठामध्ये शिक्षण घेण्यापासून विविध पदांवर काम करता आले यासाठी मी स्वतःला भाग्यवान समजतो. राहुरी विद्यापीठाचे वर्क कल्चर खूप चांगले आहे. विद्यापीठात काम करताना २१ वाण विकसित केले. होप सारख्या प्रकल्पामुळे ज्वारीचे क्षेत्र वाढण्यास मदत झाली. २५ ते ३० हजार क्विंटल बियाणे निर्मितीची क्षमता वाढविली. सध्या विद्यापीठात ३२ डेव्हलपमेंट प्रकल्प सुरू केले असून त्यामुळे विद्यापीठाच्या नावलौकिकात भर पडून महसुली उत्पन्न वाढीचे १०० कोटीचे उद्दिष्ट निश्चितच साध्य होणार आहे. या विद्यापीठातील ३८ वर्षांच्या अनुभवाची शिदोरी डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठात उपयोगात येणार आहे. आपला विद्यार्थी उद्योजक म्हणून अनेकांना रोजगार उपलब्ध करून देणारा कसा होईल हा उद्देश समोर ठेवून यापुढे काम करणार आहे. याप्रसंगी विद्यापीठ, विद्यार्थी व समन्वय संघाच्या वतीने डॉ. शरद गडाख यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. प्रमोद रसाळ, श्री. प्रमोद लहाळे, डॉ. बापूसाहेब भाकरे, श्री. मिलिंद ढोके, डॉ. दिलीप पवार, डॉ. श्रीमंत रणपिसे, डॉ. मिलिंद अहिरे, डॉ. सुनील गोरंटीवार, डॉ. उत्तम चव्हाण, डॉ. सी. एस. पाटील व डॉ. विजू अमोलिक यांनी आपले मनोगत व्यक्त केले विद्यापीठातील शास्त्रज्ञ, प्राध्यापक, कर्मचारी तसेच विद्यार्थी विद्यार्थिनी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सचिन सदाफळ यांनी तर आभार डॉ. पंडित खर्डे यांनी मानले.

मफुकृवि ई वार्ता
सप्टेंबर २०२२

वर्ष :२, अंक क्रं. : २१, सप्टेंबर, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाला अधिकृत रिमोट पायलट प्रशिक्षण संस्था म्हणून मान्यता



**दि. २८ सप्टेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या संकल्पनेतून हवामान अद्ययावत शेती व पाणी व्यवस्थापन केंद्रामध्ये कृषिसाठी ड्रोनच्या वापरावर प्रयोग करण्यासाठी प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे. नागरी विमान वाहतूक संचालनालयाने ड्रोन नियम २०२१ प्रसिद्ध केले आहेत. या नियमावलीनुसार ड्रोन चालवण्यासाठी ड्रोन पायलट परवाना आवश्यक असतो. हा परवाना नागरी विमान वाहतूक संचालनालयाने अधिकृत ड्रोन पायलट प्रशिक्षण संस्थेकडून घ्यावा लागतो. त्यासाठी आता महात्मा फुले कृषि विद्यापीठाला अधिकृत ड्रोन पायलट प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यासाठी नागरी विमान उड्डाण महासंचालनालय भारत सरकार, नवी दिल्ली या कार्यालयाने मान्यता दिली आहे.

नवी दिल्ली येथील नागरी विमान वाहतूक संचालनालयाच्या अधिकाऱ्यांनी नुकतीच महात्मा फुले कृषि विद्यापीठास भेट दिली. त्यांनी ड्रोन पायलट प्रशिक्षण केंद्र स्थापनेकरीता लागणाऱ्या सुविधा आणि मुलभुत संसाधनांची पाहणी केली. यावेळी त्यांनी कृषि संशोधन केंद्र, चास येथील ड्रोन उड्डान क्षेत्राची पाहणी केली. सर्व सुविधांची पडताळणी करुन विमान वाहतुक संचालनालयाने महात्मा फुले कृषि विद्यापीठात ड्रोन पायलट प्रशिक्षण केंद्राच्या स्थापनेसाठी मंजुरी दिली आहे. कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी या ड्रोन पायलट प्रशिक्षण संस्थेसाठी लागणाऱ्या सर्व बाबींसाठी विद्यापीठ सदैव मदत करेल असे आश्वासन दिले. महात्मा फुले कृषि विद्यापीठाला मंजूर झालेले अधिकृत ड्रोन पायलट प्रशिक्षण केंद्र हे भारतातील कृषि विद्यापीठातील पहिले व एकमेव केंद्र आहे. या ड्रोन पायलट प्रशिक्षण संस्थेच्या स्थापनेसाठी ग्राउंडझीरो एरोस्पेस, मुंबई यांच्याशी विद्यापीठाने करार केला असून ते ड्रोन पायलट प्रशिक्षणासाठी मदत करणार आहेत.

या उपक्रमाच्या उभारणीसाठी विद्यापीठाचे तत्कालीन संशोधन संचालक तथा संचालक विस्तार शिक्षण डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता शिक्षण संचालक डॉ. प्रमोद रसाळ, कास्ट प्रकल्पाचे प्रमुख संशोधक तथा विभाग प्रमुख कृषि अभियांत्रिकीचे डॉ. सुनील गोरंटीवार, कास्ट प्रकल्पाचे सहप्रमुख संशोधक डॉ. मुकुंद शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. कृषि यंत्र व शक्ती विभागाचे विभाग प्रमुख तथा कास्ट प्रकल्पाचे सदस्य डॉ. सचिन नलावडे, ग्राउंडझीरो एरोस्पेस, मुंबईचे श्री. राहुल आंबेगावकर व ध्रिती शाह, कास्ट प्रकल्पाचे संशोधन सहयोगी डॉ. गिरीषकुमार भणगे व तांत्रिक सहाय्यक इंजि. नीलकंठ मोरे यांनी यासाठी विशेष मेहनत घेतली. महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी येथील अधिकृत ड्रोन पायलट प्रशिक्षण संस्थेच्या मान्यतेचा कालावधी १० वर्षे असून मुख्य कार्यालय महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे राहिल. ड्रोन उड्डाण प्रक्षेत्र व प्रशिक्षण स्थळ हे कृषि संशोधन केंद्र, चास येथे असणार आहे. नागरी विमान उड्डाण महासंचालनालय या कार्यालयाने निश्चित करून दिलेला रिमोट पायलट प्रशिक्षण अभ्यासक्रम शिकविणे, प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणार्थी

पायलटचे मूल्यमापन करणे, अधिकृत रिमोट पायलट प्रमाणपत्र बहाल करणे ही या रिमोट पायलट प्रशिक्षण संस्थेचे मुख्य कार्य आहेत. या प्रशिक्षणासाठी पात्रता १० वी पास असून भारतीय नागरिकत्व असणे आवश्यक आहे अशी माहिती अकाउंटेबल मॅनेजर व प्रमुख संशोधक डॉ. सचिन नलावडे यांनी दिली.

## माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी उपक्रमांतर्गत कृषि विद्यापीठाचे शास्त्रज्ञ शेतकऱ्यांच्या बांधावर





**दि. १ सप्टेंबर, २०२२.** माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी या राज्यशासनाच्या उपक्रमांतर्गत महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील शास्त्रज्ञ दिवसभर शेतकऱ्यांच्या शेतावर होते. या उपक्रमाची सुरुवात राहुरी तालुक्यातील तांभेरे आणि कानडगाव या गावातून झाली. यावेळी संचालक संशोधन आणि विस्तार शिक्षण डॉ. शरद गडाख, प्रसारण केंद्र प्रमुख डॉ. पंडित खर्डे, शास्त्रज्ञ डॉ. वसंत पोखरकर, डॉ. गोकुळ वामन, डॉ. सचिन सदाफळ, डॉ. भगवान देशमुख, प्रा. अन्सार अत्तार शेख, डॉ. संजय तोडमल उपस्थित होते. तसेच विद्यापीठाचे आधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, कृषि अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. सुनिल गोरंटीवार, डॉ. मुकुंद शिंदे यांनी बाबुर्डी घुमट, जि. अहमदनगर या गावातील शेतकऱ्यांना भेट दिली. त्याच पध्दतीने विद्यापीठातील इतर शास्त्रज्ञ यांनी विविध गावांना भेटी दिल्या. या शास्त्रज्ञांनी पूर्ण दिवस शेतकऱ्यांबरोबर घालविला. शेतकऱ्यांना त्याच्या दैनंदिन शेती कामामध्ये येणाऱ्या अडचणी जाणून घेतल्या. या भेटीदरम्यान शास्त्रज्ञांनी त्या गावातील शासकीय, निमशासकीय संस्थांना भेटी दिल्या. शेतकऱ्यांबरोबर चर्चा करतांना त्या गावातील पीक पध्दती, प्रत्येक पिकावर येणारा खर्च व त्याचे उत्पन्न याचा ताळेबंद अनौपचारीक चर्चेतून जाणून घेतला. विद्यापीठांनी विकसीत केलेले तंत्रज्ञान, शेतकरी वापरत असलेले तंत्रज्ञान, गावामधील पीक पध्दती, ग्राम विकास आराखडा या बद्दल शेतकऱ्यांबरोबर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी शास्त्रज्ञांनी विविध शेतकऱ्यांच्या शेतावर भेटी देवून त्यांना मार्गदर्शन केले.

कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे यांनी राहुरी तालुक्यातील गावांना दिवसभर भेटी देऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कडधान्य सुधार प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नंदकुमार कुटे प्रमुख असलेल्या शास्त्रज्ञांच्या चमुने पाथर्डी तालुक्यातील शिराळ या गावातील शेतकऱ्यांच्या शेतावर भेट देवून शेतकऱ्यांशी विविध प्रश्नांवर मार्गदर्शन केले. औषधी व सुगंधी वनस्पती प्रकल्पाचे प्रमुख डॉ. विक्रम जांभळे व जीन बँकेचे प्रमुख डॉ. विलास आवारी या शास्त्रज्ञांनी राहुरी तालुक्यातील मानोरी व देहरे या गावातील शेतकऱ्यांच्या शेतावर भेट देवून त्यांना मार्गदर्शन केले. राजर्षी छत्रपती शाहु महाराज कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथे विभागीय विस्तार केंद्रातील कृषि विद्यावेत्ता डॉ. अशोक पिसाळ, डॉ. व्ही.एस. पाटील व चमुतील शास्त्रज्ञांनी

भुदरगड तालुक्यातील आंबवणे या गावातील शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष शेतावर भेट देवून विचारपूस केली याबद्दल शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला. माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी या उपक्रमाला शेतकऱ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.





या उपक्रमांतर्गत वनस्पती रोगशास्त्र व कृषि अणुजीवशास्त्र विभागामार्फत मु.पो. लोणी, ता. राहाता तसेच मौजे सायंखिंडी, वडगाव लांडगा, जवळे कडलग ता. संगमनेर, जि. अहमदनगर येथील दुर्गम भागातील शेतकऱ्यांच्या शेतावर भेटी देण्यात आल्या. यावेळी विभाग प्रमुख डॉ. तानाजी नरुटे, डॉ. संजय कोळसे, प्रा. मधुकर शेटे व संगमनेरचे मंडळ कृषि अधिकारी श्री. पंकज कवाडे यांनी शेतकऱ्यांसमवेत चर्चा करुन मार्गदर्शन केले. बियाणे तंत्रज्ञान संशोधन योजनेचे प्रमुख डॉ. विजय शेलार, डॉ. सुरेश झांजरे, डॉ. अनिल सुर्यवंशी, डॉ. नारायण मुसमाडे व डॉ. अविनाश कर्जुले या शास्त्रज्ञांच्या चमुने मु.पो. मानोरी, पाथरे खु. व पानेगांव, ता. राहुरी, जि. अहमदनगर येथील शेतकऱ्यांच्या शेतावर जावून सोयाबीन, कपाशी व पेरु बागेला भेटी देवून संबंधीत शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत जाणून घेतले व त्यांना मार्गदर्शन केले.






याचबरोबर राहुरी कृषि विद्यापीठांतर्गत असलेल्या पाडेगांव, ता. फलटण, जि. सातारा येथील मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्राचे ऊस विशेषज्ञ डॉ भरत रासकर, डॉ. राजेंद्र भिलारे, डॉ. सुभाष घोडके, डॉ. सुरज नलावडे व डॉ. किरणकुमार ओंबासे यांनी मु.पो. आदर्कि बु., ता. फलटण, जि. सातारा व मु.पो. जळगांव, ता. कोरेगांव, जि. सातारा येथील ऊस, टोमॅटो व कांदा तसेच सोयाबीन, आले या पिकांच्या प्रक्षेत्रावर भेटी देवून संबंधीत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कडधान्य सुधार प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नंदकुमार कुटे, तुर किटकशास्त्रज्ञ डॉ. चांगदेव वायख, तुर रोगशास्त्रज्ञ डॉ. विश्वास चव्हाण, पाथर्डीचे तालुका कृषि अधिकारी श्री. सुधीर शिंदे, श्री. जयदिप खळेकर व श्री. राहुल आठरे या सर्व शास्त्रज्ञ व

अधिकाऱ्यांनी शिराळ, ता. पाथर्डी या गावातील शेतकऱ्यांच्या शेतावर संपूर्ण दिवस थांबून त्यांच्या समस्या व शेतीमधील अडचणी समजून घेतल्या.





डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी हनुमंतगाव या गावाला भेट दिली. मध्यवर्ती परिसरात असलेल्या जैव तंत्रज्ञान विभागाचे प्रभारी अधिकारी डॉ. अनिल काळे, सहयोगी प्राध्यापक डॉ. विवेक चिमोटे, डॉ. अधिर आहेर व जीव रसायनशास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. दिलीपकुमार कचरे, डॉ. भरत भालेराव या शास्त्रज्ञांच्या चमुने टाकळी काझी, ता.जि. अहमदनगर या गावात शेतकऱ्यांच्या शेतावर भेट देवून त्यांच्या अडचणी समजुन घेतल्या. अखिल भारतीय समन्वित औषधी–सुगंधी वनस्पती व पानवेल योजनेचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. रविंद्र गायकवाड, उद्यानविद्या शास्त्रज्ञ डॉ. शर्मिला शिंदे व किटकशास्त्रज्ञ डॉ. भारत पवार यांनी चासकमान ता.जि. अहमदनगर येथील शेतकऱ्यांच्या औषधी, सुगंधी व फळबागेस भेट देवून त्यांच्या अडचणी समजुन घेतल्या. याचबरोबर टोमॅटो सुधार प्रकल्पाचे प्रभारी अधिकारी डॉ. अनिकेत चंदनशिवे व तालुका कृषि अधिकारी श्री. महेंद्र ठोकळे यांनी राहुरी तालुक्यातील मुळा धरणामुळे राहुरी तालुक्याच्या मुळ प्रवाहापासून तुटलेल्या व दुर्गम, डोंगळाळ भाग तसेच कोरडवाहू व आदिवासी क्षेत्र असणाऱ्या जांभळी व जांभुळबन या गांवांना भेटी दिल्या.





कृषि महाविद्यालय, कराडचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सातप्पा खरबडे व त्यांच्या सहकार्यांनी कराड तालुक्यातील गावांना भेटी दिल्या तसेच नंदुरबार कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. उत्तम होले, सहाय्यक कृषि अधिकारी श्री. मनोहर पावरा, डॉ. दिपककुमार अहिरे, डॉ. आर.ओ. ब्राम्हणे, प्रा. दिनेश सुर्यवंशी, प्रा. संदिप राजपूत, डॉ. संदिप वाघ

वर्ष :२, अंक क्रं. : २१, सप्टेंबर, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

यांनी नंदुरबार जिल्ह्यातील अक्राणी तालुक्यातील डाब, असली व अस्तंभा या गावांना तसेच आदिवासीबहुल नंदुरबार जिल्ह्याच्या सातपुडा रांगेतील नर्मदा नदीच्या काठावरील अतिदुर्गम भागातील आदिवासी लोकवस्ती असलेल्या मौजे खडकी, झापी, फलाई व शिंदी दिगर या गावात भेटी देऊन शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेतल्या. काष्टी, ता. मालेगाव येथील कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. विश्वनाथ शिंदे यांनी शेतकऱ्यांसमवेत चर्चा करुन त्यांना मार्गदर्शन केले. मुक्ताईनगर येथील कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. जयप्रकाश गायकवाड, तालुका कृषि अधिकारी श्री. माळी, डॉ. बी.डी. रोमाडे व डॉ. तुषार भोसले यांनी उंबरे, ता. मुक्ताईनगर या गावातील शेतकऱ्यांच्या शेतावर भेटी दिल्या.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगावचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे व सर्व प्राध्यापक राहुरी तालुक्यातील कुक्कडवेढे या गावात माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी या उपक्रमांतर्गत शेतकऱ्यांच्या शेतावर भेट दिली. यावेळी शास्त्रज्ञ डॉ. चारुदत्त चौधरी, डॉ. सखेचंद अनारसे, डॉ. प्रेरणा भोसले व प्रा. किर्ती भांगरे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. अखिल भारतीस समन्वित, कोरडवाहू फळपिके (अंजीर आणि सिताफळ) संशोधन प्रकल्प, जाधववाडी, पुणे येथील डॉ. प्रदिप दळवे, डॉ. युवराज बालगुडे, वरिष्ठ संशोधन सहाय्यक श्री. नितीन घोडके व तालुका कृषि अधिकारी, पुरंदर यांनी काळेवाडी व दिवे या गावात भेट दिली. याप्रसंगी शास्त्रज्ञांनी अंजीर पिकाली बहार नियोजन, सिताफळातील अन्नद्रव्य व्यवस्थापन तसेच रोग व्यवस्थापन या विषयी शेतकऱ्यांना प्रत्येक्ष बागेत मार्गदर्शन केले याचबरोबर कृषि संशोधन केंद्र, लोणावळा येथील रोगशास्त्रज्ञ डॉ. किरणसिंह रघुवंशी व तालुका कृषि अधिकारी, वडगांव मावळ यांच्या वतीने या उपक्रमांतर्गत कुरवंडे येथील शेतकऱ्यांसोबत उपस्थित राहुन त्यांच्या समस्या जाणून घेवून त्यांच्या शेतीविषयक अडचणींवर मार्गदर्शन केले. कृषि विस्तार व संज्ञापन विभागांतर्गत मांजरसुंबा येथे माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी या उपक्रमांतर्गत आयोजीत कार्यक्रमात विभाग प्रमुख डॉ. मिलिंद अहिरे, डॉ. गोरक्ष ससाणे, डॉ. आनंद चवई, डॉ. मनोहर धादवड, श्री. राजू राठोड उपस्थित होते.






धुळे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर यांनी फागणे, ता.जि. धुळे या गावात जाऊन शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या. या अभियानांतर्गत शास्त्रज्ञ डॉ. दिनेश नांद्रे, डॉ. खुशाल बराटे, डॉ. आर. जे. देसले, प्रा. एस.बी. देसले, डॉ. संदीप पाटील, डॉ. एस. एम. धाडगे, डॉ. विक्रांत भालेराव, डॉ. संदीप निकम, डॉ. सी. एस. ठाकरे, डॉ. आर. व्ही. पाटील, डॉ. विकास पवार, प्रा. के. बी. पाटील, प्रा. आर. टी. सुर्यवंशी, डॉ. पंकज पाटील, रोहित कडू, डॉ. आतिष पाटील, डॉ. धनराज चौधरी, डॉ. अमृता राऊत, जगदीश काथेपुरी सहभागी झाले.

मफुकृवि ई वार्ता
सप्टेंबर २०२२



## कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांचा माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी या उपक्रमात सहभाग





**दि. १ सप्टेंबर, २०२२.** माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी कार्यक्रमांतर्गत मौजे शेळकेवाडी, ता. मुळशी, जि. पुणे येथे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या उपस्थितीत शेतकरी चर्चासत्राचे आयोजन विभागीय विस्तार केंद्र, कृषि महाविद्यालय, पुणे यांनी केले. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांशी कुलगुरु डॉ. पाटील यांनी संवाद साधला तसेच शेतकऱ्यांच्या विविध पिकांवरील समस्यांची सोडवणूक विषय तज्ञांच्या मार्गदर्शनाने करण्यात आली. भात पिकाच्या उत्पादकता वाढीसाठी वडगाव मावळ भात संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. नरेंद्र काशीद यांनी एकात्मिक खत व्यवस्थापनाचे महत्त्व पटवून दिले तसेच परिसरातील भाजीपाला उत्पादकांनी आपल्या समस्यांचे निराकरण उद्यानविद्या विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. सुभाष भालेकर यांच्याशी विस्तृत चर्चेद्वारे करून घेतले. डॉ. श्रीहरी हसबनीस यांनी विविध पिकांचे एकात्मिक रोग व्यवस्थापनावर माहिती दिली तसेच गोपालकांना देशी गाय संशोधन प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने यांनी मार्गदर्शन केले. डॉ. सुनील जोगदंड यांनी पेरू बहार व्यवस्थापनाविषयी माहिती दिली. याप्रसंगी बोलताना पुणे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनील मासळकर यांनी आंब्यामध्ये नियमित व लवकर मोहोर येण्यासाठी पॅक्लोब्युट्राझोलचा वापर करण्याचा सल्ला दिला.

## कोल्हापूर कृषि महाविद्यालयात राजमाता विजयाराजे सिंधिया यांच्या तैलचित्राचे अनावरण






**दि. ३ सप्टेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेले राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि

महाविद्यालय, कोल्हापूर येथे भास्कराचार्य प्रतिष्ठानच्या सामाजिक दायित्व निधी व लोकसहभागातून बांधलेल्या राजमाता विजयाराजे सिंधिया विद्यार्थी वसतीगृहात राजमाता विजयाराजे सिंधिया यांच्या तैलचित्राच्या अनावरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन नागरी हवाई वाहतूक व पोलाद केंद्रीय मंत्री मा. ना. श्री. जोतिरादित्य शिंदे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा.ना. श्री. चंद्रकांत पाटील, अधिष्ठाता (कृषि) डॉ. प्रमोद रसाळ, सहयोगी अधिष्ठाता डॉ. राजेंद्र सुर्यवंशी उपस्थित होते. यावेळी मंत्री श्री. जोतिरादित्य शिंदे आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की भारताचा इतिहास, संस्कार, मुल्य, दिशा आणि क्षमता एकत्रित ठेवण्यासाठी मातृशक्तीचे मोठे योगदान आहे. मन व मेंदू यापेक्षा हृदयापासून कष्ट केल्यास जनसेवेचा वसा जोपासता येतो. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली इंग्लंडला मागे सोडून भारताने जागतिक पहिल्या तीन आर्थिकशक्ती म्हणुन स्थान मिळवले आहे. छपत्रती शिवाजी महाराजांनी इंग्रज, पोर्तुगीज, मुघल राजवटींना गाडले हा महाराष्ट्राचा इतिहास आहे. आयएनएस विक्रांत युध्दवाहू नौकेचे लोकार्पण ही आधुनिक भारताचे आत्मनिर्भरतेकडे जाणारे मोठे पाऊल आहे असे ते म्हणाले. याप्रसंगी श्री. चंदकांत पाटील म्हणाले की राजमाता विजयाराजे सिंधिया यांचा राजकीय व सामाजिक कार्यातील प्रवास खडतर आहे. कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी प्रास्ताविकात कपाऊंडसाठी निधीची मागणी केली. यावेळी चाटे शिक्षण समूहाचे प्रा. डॉ. भारत खराटे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन पंडित कंदले यांनी केले. अधिष्ठाता (कृषि) डॉ. प्रमोद रसाळ यांनी आभार मानले. यावेळी खा. संजय मंडलिक, खा. धनंजय महाडिक, आ. ऋतुराज पाटील, समरजीत घाडगे, जिल्हाधिकारी श्री. राहुल रेखावार उपस्थित होते.

## अभिनंदन

## डॉ. प्रदीप इंगोले यांची महात्मा फुले कषि विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेवर नियुक्ती



**दि. १ सप्टेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेच्या सदस्यपदी डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे माजी विस्तार शिक्षण संचालक डॉ. प्रदीप इंगोले यांची नियुक्ती राज्यपाल कार्यालयाद्वारे करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यात एकूण चार कृषि विद्यापीठे सेवारत असून शेतकरी, शासकीय अधिकारी, कृषि शास्त्रज्ञ, विविध विभाग आणि महत्वाचे म्हणजे राज्यकर्ते, राज्यशासन यांमधील समन्वय अधिक घट्ट करीत कृषि विद्यापीठे समाजाभीमुख करण्यासाठी शेतकरी, शास्त्रज्ञ आणि विधानसभा तथा विधान परिषद आदी विविध प्रवर्गातून सदस्यांची निवड विद्यापीठ कार्यकारी परिषदेवर मा. राज्यपाल यांचे मान्यतेने होत असते. याच अंतर्गत राहुरी येथील महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेवरील राज्यपाल नियुक्त कार्यकारी परिषद सदस्य आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीचे माजी कुलगुरू डॉ. बी वेंकटेश्वरलू यांचा सदस्यत्वाचा कालावधी २९ ऑगस्ट, २०२२ रोजी संपुष्टात आला असून त्यांचे जागेवर वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे माजी विस्तार शिक्षण संचालक डॉ. प्रदीप इंगोले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आपल्या कर्तव्यतत्परतेसाठी आणि सचोटीसाठी सर्वदूर सुप्रसिध्द असलेल्या या कृषि शास्त्रज्ञाच्या नियुक्तीने राहुरी कृषि विद्यापीठ परिवारात उत्साहाचे वातावरण आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी नवनियुक्त विद्यापीठ कार्यकारी परिषद सदस्य डॉ. प्रदीप इंगोले यांचे विद्यापीठ परिवाराचे वतीने हार्दिक अभिनंदन केले आहे.

वर्ष :२, अंक क्र. : २१, सप्टेंबर, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## श्री. संजय राऊत व श्री. पंडित शिकारे हे आहेत सप्टेंबर महिन्याचे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे आयडॉल्स




**दि. १ सप्टेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या संकल्पनेतून विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील प्रगतशील शेतकरी व महात्मा फुले कृषि विद्यापीठात पदवी घेतलेले यशस्वी कृषि उद्योजक यांचा परिचय समस्त शेतकरी वर्गाला आणि विद्यार्थ्यांना व्हावा या उद्देशाने कुलगुरु डॉ. पाटील यांनी नविन संकल्पना राबविली आहे. यामध्ये दर महिन्याला एक प्रगतशील शेतकरी व एक कृषि पदविचा कृषि उद्योजक यांच्या कार्याविषयी माहिती असलेला फलक विद्यापीठ प्रवेशद्वार, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राच्या दर्शनी भागात तसेच विद्यार्थी वसतीगृहाचा दर्शनी भागात या ठिकाणी लावण्यात येतो तसेच विद्यापीठाच्या दहा जिल्हयांच्या कार्यक्षेत्रातील कृषि महाविद्यालये, संशोधन केंद्रे आणि कृषि विज्ञान केंद्रे येथील प्रवेशद्वाराजवळ लावण्यात येतो जेणेकरुन संबंधीत प्रगतशील शेतकरी व कृषि उद्योजक यांच्या कार्याचा परिचय विद्यापीठाला आणि कृषि महाविद्यालयांना, कृषि संशोधन केंद्रांना व कृषि विज्ञान केंद्राना भेट देण्यासाठी येणाऱ्या शेतकरी, अधिकारी व विद्यार्थ्यांना होतो. तसेच या व्यक्तिंचा आदर्श घेऊन तरुण शेतकरी व पदवीधरांना प्रेरणा मिळते. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व कृषि महाविद्यालये, कृषि संशोधन केंद्रे, कृषि तंत्र विद्यालये यांच्या दर्शनीय क्षेत्रात ही आयडॉल्स् प्रत्येक महिन्याला प्रदर्शीत करण्यात येतात.

सप्टेंबर २०२२ या महिन्याकरीता शेतकरी आयडॉल म्हणुन मु.पो. कोल्हार, ता. राहाता, जि. अहमदनगर येथील श्री. संजय राऊत व कृषि उद्योजक म्हणुन पुणे कृषि महाविद्यालयातून बी.एस्सी (कृषि) चे शिक्षण घेतलेले पुणे येथील श्री. पंडित शिकारे यांचा समावेश आहे. श्री. संजय राऊत यांनी गांडूळ खत प्रकल्प, व्हर्मी वॉश युनिट तसेच व्हर्मी कल्चर युनिटची स्वंतत्रपणे उभारणी करुन गांडूळ खत, व्हर्मी वॉश व व्हर्मी कल्चर यांचे यशस्वीपणे उत्पादन घेवून विक्री करत आहेत. तसेच या उत्पादनांचा २० ते २५ टक्के वापर स्वतःच्या शेतात करुन ७० टक्क्यांपर्यंत रासायनीक खतांचा वापर कमी करुन शेती करत आहेत. कृषि उद्योजक असलेले श्री. पंडित शिकारे यांनी ग्रीन हाऊस उभारुन त्यामध्ये डच गुलाबाचे

मोठ्या प्रमाणात उत्पादन घेत आहेत. उत्पादन काढणीनंतर ग्राहकांपर्यंत पुरवठा करतांना कोल्डचेनचा यशस्वी वापर केला आहे. श्री. शिकारे यांनी डच गुलाबाची निर्यात करुन देशाला परकीय चलन मिळवून देण्यात पुढाकार घेतला आहे. त्यांनी आत्तापर्यंत मावळ तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांना ग्रीन हाऊस तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले आहे.

## शेतीसाठी ड्रोनचे महत्व या विषयावर परिषदेचे आयोजन




**दि. १२ सप्टेंबर, २०२२.** भारतीय शेतीतील निरनिराळ्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी नवीन संशोधन व तंत्रज्ञानाचा वापर कृषि क्षेत्रात करून शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी व्हावा, यामुळे शेतकऱ्यांची प्रगती व विकास होईल असा विश्वास केंद्रीय मंत्री मा. ना. श्री. नितीन गडकरी यांनी व्यक्त केला. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व ॲग्रोव्हिजन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शेतीसाठी ड्रोनचे महत्व या एकदिवसीय परिषदेत केंद्रिय मंत्री, रस्ते, वाहतुक आणि परिवहन, भारत सरकार ना. नितीन गडकरी बोलत होते. जागतिक बँक अर्थसहाय्यित, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली अंतर्गत, हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे कार्यरत आहे. या प्रकल्पांतर्गत शेतीसाठी ड्रोनचे महत्व या एकदिवसीय परिषदेचे आयोजन नागपुरातील वनामती सभागृहात करण्यात आले होते. या परिषदेसाठी राज्यभरातील ३०० हून अधिक शेतकरी, ड्रोन विक्रेते व निर्माते तसेच विविध कृषि विद्यापीठांतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. याप्रसंगी राज्याचे कृषिमंत्री ना. अब्दुल सत्तार, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. इंद्रमणी मिश्रा, भारतीय कृषि शास्त्रज्ञ निवड मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. सी.डी. मायी, भारत सरकारच्या कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सौमिता बिस्वास, कास्ट प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. सुनील गोरंटीवार, जितेंद्र गौर, नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या कृषि पदार्थ विज्ञान विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. साहु, आदिवासी विभागाचे अपर आयुक्त रवींद्र ठाकरे व ॲग्रोव्हिजन फाउंडेशनचे अध्यक्ष रवी बोरटकर आदी उपस्थित होते. या परिषदेचे आयोजन कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील व अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. मुंकुंद शिंदे, डॉ. सचिन नलावडे, डॉ. अविनाश गुलगुले, डॉ. वैभव मालुंजकर व डॉ. गिरीष भणगे यांनी नियोजन केले.

## भ्रुण प्रत्यारोपणातुन साहिवाल कालवडीचा जन्म

**दि. ९ सप्टेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालयातील देशी गाय संशोधन प्रशिक्षण केंद्रामध्ये भ्रुण प्रत्यारोपण तंत्रज्ञानातून साहिवाल गालवडीचा जन्म झाला. भ्रुण प्रत्यारोपण तंत्रज्ञानाचा प्रसार शेतकऱ्यांपर्यंत



होणे आवश्यक आहे. यातुन गावठी किंवा संकरीत गाईंद्वारे उच्च वंशावळीच्या देशी गाईंच्या कालवडी शेतकऱ्यांच्या गोठ्यात तयार होतील. यामुळे दुधाळ आणि चांगली रोग प्रतिकारक क्षमता असणाऱ्या देशी गाईंची संख्या वाढण्यास मदत होईल. विद्यापीठाच्या प्रकल्पांतर्गत गीर, साहिवाल जातीच्या कालवडी भ्रुण प्रत्यारोपण तंत्रज्ञानाद्वारे तयार झाल्या आहेत. याच बरोबरीने थारपारकर, लाल सिंधी व राठी गाईंमध्ये संशोधन सुरु असल्याचे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी सांगितले. भ्रुण प्रत्यारोपन होलस्टीन फ्रिजीयन गाईमध्ये करण्यात आले होते. महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये भ्रुण प्रत्यारेपण तंत्रज्ञानातून पहिल्यांदाच साहिवाल कालवडीचा जन्म झाला आहे. अशी माहिती प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने यांनी दिली.

पशुतज्ञ डॉ. प्रमोद साखरे म्हणाले भ्रुण प्रत्यारोपण तंत्रज्ञानाद्वारे जन्मलेल्या साहिवाल जातीच्या कालवडीचा पिता बाएफ करीम असून वळूमाता लक्ष्मी हिचे प्रती वेत दुध उत्पादन ४८०० लिटर आणि दाता गाईंची प्रति वेत दुध उत्पादन ४३८४ लिटर आहे. प्रकल्पाचे तांत्रिक प्रमुख डॉ. धीरज कणखरे म्हणाले हा प्रकल्प महाराष्ट्र शासनाने २०२०-२४ या कालावधीसाठी माजी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि माजी कृषिमंत्री दादा भुसे यांच्या विशेष प्रयत्नातून साकारला आहे. महाराष्ट्र शासनाने देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राद्वारे विद्यापीठ प्रक्षेत्र आणि शेतकऱ्यांच्या गोठ्यामध्ये भ्रुण प्रत्यारोपन तंत्रज्ञान प्रयोगिक तत्वावर वापरण्यास सुरुवात केली. या प्रकल्पांतर्गत १५० पेक्षा जास्त साहिवाल, गीर, राठी, थारपारकर आणि लाल सिंधी जातीच्या वासरांचा जन्म होणार आहे. हा प्रकल्प राहुरी येथील एनडीडीबी सिमेन स्टेशनाच्या सहकार्याने राबविण्यात येत आहे. विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, पुणे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनील मासळकर, विभाग प्रमुख डॉ. दिनकर कांबळे यांनी सर्व शास्त्रज्ञांचे अभिनंदन केले. प्रकल्पाच्या यशस्वितेसाठी डॉ. सोमनाथ माने, डॉ. धीरज कणखरे, डॉ. विष्णु नरवडे, डॉ. प्रमोद साखरे, डॉ. सुनील अंडागळे आणि डॉ. शिवकुमार पाटील यांचे सहकार्य लाभले.

## भ्रुण प्रत्यारोपण तंत्रज्ञानाद्वारे गीर कालवडीचा जन्म

**दि. २१ सप्टेंबर, २०२२.** देशी गोवंश संवर्धनासोबत भ्रुण प्रत्यारोपण या आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करुन अधिक दुग्ध क्षमतेच्या देशी कालवडी निर्माण करणे ही काळाची गरज असून या तंत्रज्ञानाचा वापर व प्रसार सर्वसामान्य पशुपालकांपर्यंत होणे गरजेचे आहे असे प्रतिपादन कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. भारतीय गोवंशाचे शास्त्रीयदृष्टया संवर्धन आणि संशोधन गरजेचे आहे. यासाठी महाराष्ट्र शासनाच्या आर्थिक सहाय्याने पुणे येथील कृषि महाविद्यालयामध्ये देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र कार्यरत आहे. या प्रकल्पात देशी गाईंच्या संवर्धनासोबत भ्रुण प्रत्यारोपण तंत्रज्ञानाचा अवलंब करुन

वर्ष :२, अंक क्रं. : २१, सप्टेंबर, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी



जातीवंत पैदाशीवर भर दिला जात आहे. या तंत्रज्ञानात गाईच्या स्त्री बीजांडावरुन स्त्री बीजे काढली जातात व उच्च वंशावळ असलेल्या वळूच्या विर्यासोबत प्रयोगशाळेत फलित करुन भृण परिपक्व केले जाते. त्यानंतर ऋतूचक्र नियमन केलेल्या कमी दुध देणाऱ्या गाईच्या गर्भाशयात तो भ्रूण प्रत्यारोपीत करण्यात येते. सुमारे २७३ दिवसानंतर त्यापासून अधिक दुग्धक्षमतेच्या कालवडी उपलब्ध होतात. या तंत्रज्ञानाव्दारे गो संशोधन व विकास प्रकल्प, राहुरी येथील प्रक्षेत्रावर जन्मलेल्या चार गीर कालवडींची पाहणी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केली. आयव्हीएफ तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कमी वेळेत उच्च दुग्धक्षमतेचे देशी गोधन तयार करणे शक्य आहे. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या माध्यमातून हे तंत्रज्ञान सामान्य शेतकरी व पशुपालकांसाठी उपलब्ध करून दिले जात आहे. हे तंत्रज्ञान पशुपालकांपर्यत पोहचविण्याचे आवाहन डॉ. पाटील यांनी केले.

## अभिनंदन

### डॉ. उल्हास सुर्वे बेनिन देशाच्या दौऱ्याहून परत



**दि. ९ ते १८ सप्टेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील कृषि विद्या विभागातील शास्त्रज्ञ तथा एकात्मिक शेती पध्दती संशोधन प्रकल्पाचे प्रमुख कृषि विद्यावेत्ता तथा सेंद्रिय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. उल्हास सुर्वे हे नुकतेच बेनिन या देशातील कृषि परिस्थितीकी या विषयातील कार्यशाळेला उपस्थित राहुन भारतात परतले. ही कार्यशाळा ९ ते १८ सप्टेंबर, २०२२ या कालावधीत आफ्रिका खंडातील बेनिन या देशात पार पडली. सदर कार्यशाळेसाठी आठ देशातून १६० शास्त्रज्ञ सहभागी झाले होते. यात भारत, जर्मनी, बेनिन, इथिओपीया, केनिया, मादागास्कर, बर्किना, तुनेसीया या देशातून शास्त्रज्ञ सहभागी झाले होते. या कार्यशाळेच्या दरम्यान सहभागी शास्त्रज्ञांनी कोटानावू तसेच बोहीकॉन येथील विविध संस्था व शेतकऱ्यांच्या शेतावर भेटी दिल्या. यामध्ये शाश्वत शेती बायोचार तसेच विविध देशातील विस्तार कार्य याविषयी विचार मंथन करण्यात आले. प्रक्षेत्र भेटी दरम्यान फुप्रो बियाणे उत्पादक संघ तसेच कृषि विभागालादेखील भेट दिली. ही कार्यशाळा जर्मनीतील जी.आय.झेड. प्रकल्पांतर्गत आयोजीत करण्यात आली होती. भारतातील सर्व कृषि विद्यापीठातून डॉ. उल्हास सुर्वे हे एकमेव शास्त्रज्ञ या कार्यशाळेसाठी उपस्थित होते. सदरच्या कार्यशाळेसाठी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील तसेच विद्यापीठाचे तत्कालीन संशोधन संचालक डॉ. शरद गडाख यांनी डॉ. उल्हास सुर्वे यांची निवड केली होती. या दौऱ्यासाठी निवड झाल्याबद्दल डॉ. उल्हास सुर्वे यांचे विद्यापीठाच्या सर्व स्तरावरुन अभिनंदन करण्यात आले.

## वसंतराव नाईक कृषि गौरव पुरस्कार शास्त्रज्ञ डॉ. मनोज माळी यांना प्रदान



**दि. १८ सप्टेंबर, २०२२.** हरितक्रांतीचे प्रणेते, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दिला जाणारा वसंतराव नाईक कृषि गौरव पुरस्कार हळद संशोधन केंद्र, कसबे डिग्रज, ता. मिरज, जि. सांगली या योजनेचे प्रभारी अधिकारी डॉ. मनोज माळी यांना पुसद येथे यवतमाळचे जिल्हाधिकारी डॉ. अमोल येडगे यांचे शुभहस्ते प्रदान करण्यात आला. शाल, श्रीफळ, स्मृतिमानचिन्ह व सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे. हळद लागवड आणि प्रक्रियेसाठी सुयोग्य असलेला फुले हरिद्रा वाण निर्मितीमध्ये डॉ. मनोज माळी यांचे योगदान आहे. संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या हळद संशोधन आणि प्रक्रिया धोरणाची सुयोग्य अंमलबजावणी करण्यासाठी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, तत्कालीन संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख यांचे मार्गदर्शनाखाली डॉ. मनोज माळी यांनी योगदान दिले आहे. त्यांनी विविध कार्यक्रमातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले आहे. यापूर्वी २०२०-२१ मध्ये त्यांना गोवा येथे झालेल्या राष्ट्रीय मसाला परिषदेत उत्कृष्ट सादरीकरण प्रमाणपत्र तथा मानचिन्ह देवून गौरविण्यात आले आहे.

## शिक्षक दिनाच्या निमित्ताने कृषि महाविद्यालय, पुणे येथील शिक्षकांचा गौरव समारंभ संपन्न



**दि. ५ सप्टेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालय, पुणे आणि साई सर्विसेस मारुती सुझुकी इंडिया प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिक्षक दिनाचे औचित्य साधून विशेष योगदान देणाऱ्या शिक्षकांना गौरविण्यात आले. याप्रसंगी मंचावर सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनील मासळकर उपस्थित होते.

यावेळी जैविक नत्र स्थिरीकरण योजनेचे प्रमुख डॉ. श्रीहरी हसबनीस, भाजीपाला उत्पादन आणि औषधे चाचणीचे प्रमुख डॉ. सुभाष भालेकर, देशी गोवंश संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख डॉ. सोमनाथ माने, उच्च तंत्रज्ञान फुले उत्पादनाचे प्रमुख डॉ. सचिन चव्हाण, हरित व स्वच्छ परिसर प्रकल्पाचे समन्वयक डॉ. धर्मेंद्रकुमार फाळके, महाविद्यालयाचे भारतीय कृषि संशोधन परिषदेचे नोडल अधिकारी डॉ. अभय पाटील, महाविद्यालय मान्यता प्रस्तावाचे संकलक डॉ. पंकज रौन्दल,

वर्ष :२, अंक क्रं. : २१, सप्टेंबर, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. दिनकर सावळे, राष्ट्रीय छात्रसेवा योजनेचे मेजर डॉ. राम चौधरी, जैविक कीड नियंत्रण प्रकल्पाचे डॉ. संतोष मोरे, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग प्रमुख डॉ. धीरज कणखरे, सहाय्यक नियंत्रक डॉ. बाळासाहेब पवार, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. प्रमोद पाटील, सहाय्यक कुलसचिव श्री. अजाज सय्यद या सर्वांना सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनील मासळकर यांचे हस्ते शाल, स्मृतिचिन्ह, श्रीफळ आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी साई सर्विसेस मारुती सुझुकी इंडिया प्रा. लि. कंपनीचे संस्थात्मक विक्री व्यवस्थापक श्री. मंगेश राऊत, विक्री उपव्यवस्थापक श्री. राहुल खराटे, सहाय्यक व्यवस्थापक श्री. शैलेश सोमण, श्री. सोनावणे उपस्थित होते. सदर कार्यक्रमास कृषि महाविद्यालय, पुणे येथील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पल्लवी सूर्यवंशी यांनी केले.

## हाळगाव कृषि महाविद्यालयात शिक्षण दिनाचे आयोजन



**दि. ५ सप्टेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे आजादी च्या अमृतमहोत्सवअंतर्गत शिक्षक दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्षस्थानी सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे उपस्थित होते. शिक्षक दिनाच्या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून सहाय्यक कुलसचिव श्री. एकनाथ बांगर उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी गोविंद भराड व कु. प्रज्ञा घुले यांनी शिक्षकांप्रती आपल्या भावना व्यक्त केल्या. सुरुवातीला महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. सखेचंद अनारसे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. चारुदत्त चौधरी यांनी शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन कु. प्रज्ञा घुले हिने केले तर आभार कु. समीक्षा आव्हाळे हिने मानले. या कार्यक्रमाला शिक्षक तसेच विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जबलपूर येथे सौर उर्जा सिंचन प्रणाली या विषयावर प्रशिक्षण संपन्न



**दि. ६ ते ८ सप्टेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील जागतिक बँक अर्थसहाय्यित हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान प्रकल्पाअंतर्गत प्राध्यापक, विद्यार्थी, कृषि विज्ञान केंद्राचे विषयतज्ञ व शेतकऱ्यांसाठी सौर उर्जा सिंचन प्रणाली या विषयावर दोन तुकड्यांचे तीन दिवसीय प्रषिक्षण कार्यक्रम जबलपूर– मध्यप्रदेश येथे बोरलॉग इनस्टिट्यूट ऑफ साउथ एशिया (बीसा) येथे नुकतेच संपन्न झाले. या तीन दिवसांच्या प्रशिक्षणात बोरलॉग इनस्टिट्यूटचे प्रमुख पंकज सिंह व त्यांचे नवी दिल्ली येथील सहकारी परेश शिरसाठ आणि क्षितिज पांडे यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या सुचनेनुसार व अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, कास्ट प्रकल्पाचे प्रमुख संशोधक आणि कृषि अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख डॉ. सुनिल गोरंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठातील प्राध्यापक विद्यार्थी व शेतकरी यांच्यासाठी सदरील प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख यांनी प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा दिल्या. यावेळी कास्ट प्रकल्पाचे सहप्रमुख संशोधक डॉ. मुकुंद शिंदे, डॉ. सुनिल कदम आणि डॉ. सचिन सदाफळ उपस्थित होते. सदरील तुकडीचे नेतृत्व इंजि. महेश पाचरणे यांनी केले.

## खरीप चारापिके दिनाचे आयोजन




**दि. ८ सप्टेंबर, २०२२.** सध्या देशामध्ये हिरव्या व वाळलेल्या चाऱ्याचा तुटवडा आहे. चारा पिकांची लागवड करतांना महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसीत केलेल्या सुधारीत तंत्रज्ञानाचा वापर करुन विविध चारा पिकांच्या वाणांची लागवड

केल्यास हिरव्या चाऱ्याचे प्रमाण वाढू शकेल. शेतकरी बांधवांनी वर्षभर चारा निर्मितीचे नियोजन करावे. त्यामुळे दुग्ध व्यावसाय फायदेशीर होईल असे प्रतिपादन कृषि वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विजु अमोलीक यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील अखिल भारतीय समन्वित चारा पिके संशोधन व उपयोगीता प्रकल्पाच्या वतीने खरीप चारापिके दिवस आयोजीत करण्यात आला होता. याप्रसंगी चारा पैदासकार डॉ. जी.एन. देवरे, दुग्धशास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. दिलीप देवकर, जीवरसायन शास्त्रज्ञ डॉ. शिवाजी दमामे व माजी चारा पैदासकार डॉ. प्रसन्न सुराणा उपस्थित होते. तांत्रिक मार्गदर्शनात डॉ. दिलीप देवकर यांनी अधिक दुग्धोत्पानासाठी जनावरांचे व्यवस्थापन, डॉ. संदिप लांडगे यांनी खरीप चारा पिकांचे कीड व्यवस्थापन, डॉ. प्रसन्न सुराणा यांनी पशुधनासाठी विविध खरीप चारापिके व डॉ. विजयकुमार शिंदे यांनी पशुधनासाठी गवत लागवड या विषयांवरी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे स्वागत डॉ. जी.एन. देवरे यांनी केले तर प्रास्ताविक डॉ. शिवाजी दमामे यांनी करतांना चारा पिकांच्या गुणवत्तेबद्दल माहिती दिली. यावेळी प्रक्षेत्र भेटीचे नियोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. देवेंद्र वंजारे यांनी तर आभार डॉ. शहाजी नवले यांनी मानले. या कार्यक्रमासाठी परिसरातील १५० पेक्षा जास्त शेतकरी व विद्यार्थी उपस्थित होते.

## राहुरी कृषि विद्यापीठाच्या रब्बी ज्वारीच्या बियाण्यास शेतकऱ्यांची पसंती



**दि. १२ सप्टेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसीत केलेल्या विविध पिकाच्या वाणांना शेतकऱ्यांची प्रथम पसंती असते. विद्यापीठाच्या ज्वारी सुधार प्रकल्पाने जमिनीच्या प्रकारानुसार रब्बी ज्वारीचे वाण विकसीत केले आहेत. यामध्ये हलक्या जमिनीसाठी फुले अनुराधा, मध्यम जमिनीसाठी फुले सुचित्रा, भारी तसेच बागायती जमिनीसाठी फुले वसुधा, फुले रेवती व लाह्यांसाठी फुले पंचमी हे वाण विकसीत केले आहेत. कृषि विद्यापीठाच्या बियाण्यांवर शेतकऱ्यांचा विश्वास असून शेतकऱ्यांना विनाकष्ट व त्यांच्या विभागामध्ये किंवा जवळील जिल्ह्यामध्ये बियाणे उपलब्ध व्हावे म्हणुन विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांचे सुचनेनुसार व संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती परिसर, कृषि संशोधन केंद्र, सोलापूर, पंढरपूर, कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ, कृषि संशोधन केंद्र, चास, सावळीविहीर, कृषि तंत्र विद्यालय केंद्र, पुणतांबा या ठिकाणी विक्रीसाठी उपलब्ध करुन दिले आहे.

## धुळे कृषि विज्ञान केंद्रातर्फे पशुधनाच्या लम्पी त्वचारोगाविषयी कार्यशाळेचे आयोजन



**दि.१४ सप्टेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्र, धुळे व लुपिन फौंडेशन, धुळे यांच्या सहकार्याने पशुधनातील लम्पी त्वचारोगाविषयी एकदिवसीय कार्यशाळा कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या कार्यशाळेस प्रमुख पाहुणे म्हणुन पुणे येथील पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. बोरकर, धुळे पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. विसावे, कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे, धुळे येथील लुपिन फौंडेशनचे प्रकल्प व्यवस्थापक श्री. निलेश पवार, विभागीय विस्तार केंद्राचे उद्यानविद्यावेत्ता प्रा. श्रीधर देसले, प्रमुख मार्गदर्शक म्हणुन धुळे पशुसंवर्धन विभागाचे सहायक उपायुक्त डॉ. मिलिंद भणगे, श्री.जगदीश काथेपुरी, डॉ धनराज चौधरी, डॉ. आतिष पाटील, धुळे येथील लुपिन फौंडेशनचे क्षेत्रीय व्यवस्थापक श्री. विनोद मासुळे, पुणे येथील पशुसंवर्धन अधिकारी डॉ. पाटील उपस्थित होते.

कार्यशाळेचे प्रास्ताविक डॉ.दिनेश नांद्रे यांनी केले. कार्यशाळेत तज्ञांनी लंम्पी त्वचा रोग, हा रोग पशुधानामध्ये कसा होतो, पशुधानातील कोणत्या प्रजातीमध्ये होतो, त्याचा प्रसार कसा होतो, आजाराची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाययोजना, लसीकरण, काळजी व निगा या विषयी तसेच पशुसंवर्धन विभाग राबवत असलेल्या उपाय योजना विषयी माहिती अवगत करून दिली. अध्यक्षीय मार्गदर्शनामध्ये डॉ. चिंतामणी देवकर यांनी कृषि बरोबर कृषि पूरक व्यवसायाचे महत्व अधोरेखित करून शेतकरी उत्पन्न दुप्पट होण्यामध्ये पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे याचा उल्लेख करून उपस्थितांना मार्गदर्शन केले तसेच कृषि विज्ञान केंद्र, धुळे हे शेतकऱ्यांसाठी राबवीत असलेल्या उपक्रमांचे कौतुक केले. सूत्रसंचालन डॉ. धनराज चौधरी यांनी केले तर आभार डॉ. अतिश पाटील यांनी मानले. या कार्यशाळेसाठी कृषि विज्ञान केद्र धुळे येथील अधिकारी व कर्मचारी तसेच लुपिन फौंडेशन, धुळे यांचे सहकार्य लाभले.

## देशी गोवंशच्या शेणापासुन केलेल्या वस्तुंना मागणी

**दि. ९ सप्टेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालय, पुणे येथे पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाने देशी गोवंशच्या शेणापासून विविध वस्तु तयार केल्या आहेत. महाराष्ट्र शासनाने या विभागांतर्गत दोन वर्षापूर्वी सुरु केलेल्या या प्रकल्पात भारतात दुधासाठी प्रसिध्द अशा सहिवाल, गीर, राठी, थारपारकर व लाल सिंधी या गाईंचे तुलनात्मक संशोधन चालू आहे. संशोधनासोबत शेण व गोमुत्राचे मुल्यवर्धन करुन त्यापासुन गांडुळ खत, बायामिक्स,



पर्यावरणपुरक गणेशमुर्ती, कुंड्या, पणत्या अशा अनेक नाविन्यपुर्ण वस्तु बनवण्यात येत आहेत. तर शेण व शेतातील शिल्लक काडीकचरा, भुस्सा यापासुन गोकाष्ठ म्हणजेच लाकुडही बनविण्याचा प्रयत्न या केंद्रात सुरु आहे. सध्या पर्यावरणपुरक गणेशमुर्तींबाबत जागृती वाढत आहे. त्यामुळे शाळुमातीच्याही मुर्तींच्या तुलनेत कृषि महाविद्यालयाने शेण व गोमुत्राच्या मुल्यवर्धनातून तयार केलेल्या व विजर्सनानंतर खत म्हणनु उपयुक्त ठरणाऱ्या गणेशमुर्ती, पणत्या, मोबाईल स्टँड तसेच कुंड्यांसह विविध नाविन्यपुर्ण वस्तुंना मागणी वाढत आहे. केंद्रात शेणापासुन तयार झालेल्या बायोगॅसद्वारे दुध व दुग्धजन्य पदार्थ निर्मिती तसेच प्रयोगशाळाही चालवली जाते. बायोगॅस स्लरीतुन पाणी काढुन दाणेदार शेणखत प्रकल्पही सुरु आहे. देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रामार्फत विविध देशी गाईंची प्रात्यक्षिके, दुग्ध प्रक्रिया, शेण, गोमुत्र मुल्यवर्धन व प्रक्रिया यांची प्रात्यक्षिके व प्रशिक्षणाच्या माध्यमातून हे तंत्रज्ञान लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

## कोल्हापूर जिल्ह्यातील मडीलगे गावाच्या शेतकऱ्यांचा कृषि विद्यापीठात अभ्यास दौरा



**दि. १७ सप्टेंबर, २०२२.** मडीलगे गावातील तरुणांना गावातच रोजगार उपलब्ध व्हावा. गावात फळ पिकांची लागवड मोठ्या प्रमाणात होऊन मूल्यवर्धनाद्वारे उपपदार्थांची निर्मिती करून उत्पादन ते बाजारपेठ साखळी तयार झाल्यास मडीलगे गाव मॉडेल व्हिलेज म्हणून विकसित होण्यास वेळ लागणार नाही असे प्रतिपादन विद्यापीठाचे संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख यांनी केले. मडीलगे ता. भुदरगड जि. कोल्हापूर या गावातील श्रीराम पाणीपुरवठा संस्थेचे सभासद शेतकऱ्यांचा राहुरी कृषि विद्यापीठ अभ्यास दौऱ्याच्या समाप्तीनंतर झालेल्या कार्यक्रमात डॉ. गडाख मार्गदर्शन करताना बोलत

होते. यावेळी या अभ्यास दौऱ्याचे आयोजक विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य श्री. दत्तात्रय उगले, प्रसारण केंद्राचे प्रमुख डॉ. पंडित खर्डे, जनसंपर्क अधिकारी डॉ. गोकुळ वामन उपस्थित होते. यावेळी श्री. दत्तात्रेय उगले मार्गदर्शन करताना म्हणाले की सध्याचे युग हे नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याचे युग असून कृषि क्षेत्र ही त्याला अपवाद नाही. विद्यापीठात होत असलेले संशोधन तसेच नवनवीन तंत्रज्ञान सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावे याचबरोबर विद्यापीठाचा जास्तीत जास्त फायदा शेतकरी बंधूंना कसा होईल हा या अभ्यास दौऱ्याच्या आयोजनाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमाचे स्वागत, प्रास्ताविक व आभार प्रदर्शन डॉ. गोकुळ वामन यांनी केले.

## तूर उत्पादक शेतकऱ्यांना मार्गदर्शन



**दि. २ सप्टेंबर, २०२२.** तुरीच्या लागवडीनंतर ४५ दिवसांनी वरुन ५ सें. मी. अंतरावर एकदाच जर तुरीचे शेंडे खुडले तर निव्वळ शेंडे खुडल्यामुळे देखील उत्पन्न १३ ते १५ टक्यांनी वाढते असे प्रतिपादन विद्यापीठाच्या कडधान्य सुधार प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नंदकुमार कुटे यांनी केले. कडधान्य सुधार प्रकल्पाच्या वतीने शिराळ व शिंगवे केशव, ता. पाथर्डी येथील शेतकऱ्यांना हेलीओकील, कामगंध सापळे, हेलिल्यूर व जिब्रालिक ॲसीड या कृषि निविष्ठांचे वितरण करण्यात आले. त्यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन डॉ. कुटे बोलत होते. यावेळी तूर किटकशास्त्रज्ञ डॉ. चांगदेव वायळ आपल्या मार्गदर्शनात तूर पिकावरील किडी व त्यावरील नियंत्रणाच्या उपाययोजना सांगितल्या. रोगशास्त्रज्ञ डॉ. विश्वास चव्हाण यांनी तुरीवरील रोग नियंत्रणाबाबत माहिती दिली यावेळी कृषि पर्यवेक्षक बाळासाहेब काकडे, शिराळ येथील प्रगतिशील शेतकरी सोन्याबापू गोरे, महेश घोरपडे, शेखर आव्हाड, लक्ष्मण आव्हाड व संतोष आव्हाड उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठातील शिक्षकवर्गीय अधिकाऱ्यांना कारकीर्द प्रगती योजना लागू

**दि. २२ सप्टेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीसह राज्यातील तीनही कृषि विद्यापीठातील शिक्षकवर्गीय अधिकाऱ्यांना कारकीर्द प्रगती योजना (CAS) लागू करण्याबाबतची मागणी सातत्याने विद्यापीठातील शिक्षकवर्गीय अधिकाऱ्यांकडून होत होती. या संदर्भातील मागणीचा प्रस्ताव गेल्या १३ महिन्यांपासून शासन स्तरावर मंजुरीसाठी प्रक्रियेमध्ये होता. याबाबत कृषि मंत्री मा.ना. अब्दुल सत्तार यांचे मान्यतेने कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांचे मार्गदर्शनाखाली प्रधान सचिव (कृषि) श्री. एकनाथ डवले, सहसचिव (कृषि) श्री. रासकर, अव्वर सचिव (कृषि) श्री. उमेश चांदिवडे यांचे सहकार्याने कर्मचारी समन्वय संघ व सर्व लाभार्थी प्राध्यापक यांचे अथक परिश्रमातून शासन निर्णय निर्गमीत झाला. या कामी तत्कालीन संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, नियंत्रक डॉ. बापूसाहेब

भाकरे, कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे, कुलगुरुंचे विशेष कार्य अधिकारी डॉ. महानंद माने, कर्मचारी समन्वय संघाचे अध्यक्ष डॉ. सी.डी. देवकर, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे श्री. गोखले यांच्या सहकार्यामुळे कारकिर्द प्रगती योजना विद्यापीठातील अधिकाऱ्यांना लागु झाल्याचे समन्वय संघाचे उपाध्यक्ष डॉ. उत्तम कदम यांनी सांगितले. सदरची कारकीर्द प्रगती योजना राज्यातील चारही कृषि विद्यापीठातील शिक्षकवर्गीय अधिकाऱ्यांना लागू झाल्यामुळे त्यांची बऱ्याच दिवसांची मागणी पुर्ण झाली आहे.

## भोर तालुक्यात अंजीर व सिताफळ उत्पादकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न



**दि. १६ सप्टेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेले अखिल भारतीय समन्वित कोरडवाहू फळपिके (अंजीर आणि सिताफळ) संशोधन प्रकल्प, जाधववाडी, कृषि विज्ञान केंद्र, बारामती, महाराष्ट्र शासन कृषि विभाग व कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) यांच्या संयुक्त विद्यमाने माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी या उपक्रमाचे औचित्य साधून अंजीर व सिताफळ फळबाग लागवड तंत्रज्ञान या विषयावरील कौशल्य आधारित प्रशिक्षण व इतर कार्यक्रमाचे आयोजन शिवाई ॲग्रो टुरिझम, कासुर्डी खेबा, ता. भोर, जि. पुणे येथे करण्यात आले होते. प्रशिक्षणात मार्गदर्शन करण्यासाठी जाधववाडी येथील अंजीर व सिताफळ संशोधन प्रकल्पाचे उद्यानविद्यावेत्ता डॉ. प्रदीप दळवे, कृषि विज्ञान केंद्र, बारामती येथील विषय विशेषज्ञ श्री. यशवंत जगदाळे, मंडळ कृषि अधिकारी श्री. राजेंद्र डोंबाळे, कृषि सहाय्यक श्री. विनायक पारठे व तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक श्री. लक्ष्मीकांत कणसे उपस्थित होते. या कार्यक्रमात कृषि विभागामार्फत श्री. व्ही.टी. पारठे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. श्री. राजेंद्र डोंबाळे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली तसेच कृषि विभागाच्या विविध योजनांची माहिती दिली. कार्यक्रमाला शेतकरी व शेतमजूर बहुसंख्येने उपस्थित होते.

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे राष्ट्रीय पोषण अभियान तसेच वृक्षारोपन कार्यक्रम संपन्न

**दि. १७ सप्टेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्र, धुळे व इफको, धुळे यांचे संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय पोषण अभियान-२०२२ व वृक्षारोपन कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. महिला आणि बालकांमधील कुपोषण कमी व्हावे आणि सुदृढ राष्ट्र निर्माण व्हावे हा या अभियानाचा हेतू असून पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदी यांनी दि. ८ मार्च, २०१८ रोजी राजस्थानातील झुनझुनू येथून पोषण अभियानाची सुरुवात केली होती. यावर्षी महिला और स्वास्थ, बच्चा और शिक्षा पोषण भी पढाई भी हे राष्ट्रीय पोषण अभियानासाठीचे घोषवाक्य आहे. या



घोषवाक्याला अनुसरुन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे होते. यावेळी केंद्रिय कृषि व शेतकरी कल्याण मंत्री मा.ना. श्री. नरेंद्रसिंह तोमर यांनी लाईव्ह वेबकास्टींगद्वारे शेतकरी महिलांशी संवाद साधला. तांत्रिक मार्गदर्शनात प्रा. रोहित कडु, श्रीमती अम्रिता राऊत, सौ. प्राची काळे यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. याप्रसंगी उपस्थित महिलांना परसबाग बियाणेकीटचे वाटप करण्यात आले.

## ऑक्टोबर महिन्यातील कामांचा तपशील

### बागायती कापूस

- मोठ्या प्रमाणात गुलाबी बोंडअळीचे पतंग अडकविण्यासाठी प्रति हेक्टरी १० ते १२ कामगंध सापळे लावावेत.
- गुलाबी बोंडअळीग्रस्त डोमकळ्या तोडून आतील अळीसह नष्ट कराव्यात.
- पिकातील २० ते ३० टक्के बोंडे फुटल्यानंतर पहिली वेचणी करून घ्यावी. त्यानंतर १५ ते २० दिवसांच्या अंतराने अनुक्रमे दुसरी व तिसरी वेचणी करावी.
- कापूस वेचणी आटोपल्यानंतर सर्व पऱ्हाट्या उपटून शेताबाहेर न्याव्यात व त्याचा कंपोस्ट खत तयार करण्यासाठी वापर करावा. जेणेकरून किडींच्या अवस्था नष्ट होतील.

### ऊस

- आडसाली उसाच्या लागणीस को.८६०३२ या जातीसाठी शिफारशीत (५००:२००:२०० किलो नत्र, स्फुरद व पालाश प्रति हेक्टरी) खतमात्रेच्या १० टक्के नत्र ५० किलो प्रति हेक्टरी खताची तिसरी मात्रा (१२ ते १६ आठवडे वयाच्या उसासाठी) देण्यासाठी युरीया ११० किलो प्रति हेक्टरी वापरावा व इतर जातीच्या उसाकरीता प्रति हेक्टरी ४० किलो नत्र खतांचा तिसरा हप्ता (८७ किलो युरिया) लागणीनंतर १२ ते १६ आठवडयांनी द्यावा. नत्र खताची मात्रा देण्यासाठी निमकोटेड युरीयाचा वापर करावा.
- आडसाली उसाच्या लागणीस ६० दिवसांनी प्रतिहेक्टरी ५ लिटर मल्टीमॅक्रोन्युट्रीयंट (नत्र ८%, स्फुरद ८% व पालश ८%)व मल्टीमायक्रोन्युंट्रीयंट (ग्रेड–२) या द्रवरूप खतांची प्रत्येकी ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी उसाच्या लागणीस ९० दिवस झाले असल्यास प्रतिहेक्टरी ७.५ लिटर मल्टीमॅक्रोन्युट्रीयंट व मल्टीमायक्रोन्युटीयंटची प्रत्येकी ७५० लिटर पाण्यातून फवारणी करावी.
- आडसाली उसाला ॲसेटोबॅक्टर जिवाणू संवर्धकाची बिजप्रक्रीया लागणीचे वेळी केलेली नसल्यास ६० दिवसांनी १ लिटर द्रवरूप ॲसेटोबॅक्टर जिवाणू संवर्धकाची २०० लिटर पाण्यात मिसळून हेक्टरी फवारणी करावी.
- पूर्वहंगामी उसाच्या लागवडीसाठी पूर्वतयारी करा, पूर्वहंगामी उसाची लागण १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर या कालावधीत पूर्ण करा.

- लागणीसाठी को.८६०३२, को.एम. ०२६५, फुले १०००१, को.एम.१२०८५ (फुले ९०५७), व्ही. एस.आय.१२१२१ आणि व्ही.एस.आय. ४३४ या जातींची निवड करा.
- लागणीच्या वेळी प्रति हेक्टरी ४० किलो नत्र (८७ किलो युरिया) को.८६०३२ जातीसाठी व इतर सर्व जातींसाठी ३४ किलो नत्र (७४ किलो युरिया) तसेच ८५ किलो स्फुरद (५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) आणि ८५ किलो पालाश (१४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) ही रासायनिक खते सरीमध्ये द्यावीत.
- लागणीपूर्वी बेण्यास ३०० मिली. मॅलॅथिऑन अथवा २६५ मिली डायमेथोएट व १०० ग्रॅ बावीस्टीन १०० लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात बेणे १० मिनीटे बुडवुन बेणे प्रक्रिया करावी. या बिजप्रक्रियेनंतर प्रति हेक्टरी १० किलो ॲसेटोबॅक्टर अथवा १ लिटर द्रवरूप ॲसेटोबॅक्टर व स्फुरद विरघळविणारे जीवाणू १.२५ किलो १०० लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात कांडया ३० मिनीटे बुडवाव्यात.
- पाणी बचतीच्या दृष्टीने मध्यम जमिनीसाठी ७५–१५० सेंमी पट्टा पद्धतीचा वापर करावा यासाठी ७५ सें.मी. अंतराच्या जोड ओळीनंतर एक ओळ रिकामी सोडावी सलग पद्धतीने लागवडीसाठी हलक्या जमिनीत ९० सें.मी., मध्यम जमिनीत १०० सें.मी. तर भारी जमिनीम ध्ये १२० सें.मी. दोन सऱ्यातील अंतर ठेवावे. पाण्याच्या अधिक बचतीसाठी ठिबक सिंचनाचा वापर करावा.

### हरभरा व्यवस्थापन

- २० ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर पर्यंत बागायती हरभरा बीजप्रकिया करुन पेरावा.
- पेरणीनंतर लगेच पुरेसा ओलावा असताना उगवणीपूर्व तणनाशक पेंडिमेथॉलीन फवारावे.
- किडनियंत्रणासाठी एकात्मिक किड नियंत्रण पध्दतीचा अवलंब करावा. यामध्ये सापळा पीक, कामगंध सापळे, पक्षी थांबे याचा अवलंब करावा.

### तूर

- पिकाच्या शेंगा भरण्याच्या अवस्थेत किडी पासून संरक्षणासाठी हेलिकोकिल (५०० मिली / ५०० लि. पाणी ) या जैविक किटकनाशकाची दुसरी फवारणी करावी व आवश्यकता असेल तर तिसरी फवारणी १८.५ % एस सी क्लोरअन्ट्रीनिलोप्रोल १५० मिली अथवा इमामेक्टीन बेन्झोएट ५०% एस. जी. २०० ग्रॅम अथवा फल्युबेंडामाईड ४५ % एस. सी. १५० मिली/ ५०० लि. पाणी या किटकनाशकाची करावी.
- शेंगा भरण्याच्या अवस्थेत पाऊस नसल्यास पिकास संरक्षित पाणी दयावे किंवा २ टक्के युरियाची किंवा २ टक्के पोटॅशिअम नाईट्रेटची फवारणी करावी.

### नाचणी पीक

- नाचणी पीक पावसाच्या पाण्यावर घेतले जाते. पावसामध्ये खंड पडल्यास उपलब्धतेनुसार संरक्षित पाणी द्यावे.
- भेसळ काढणे.

### रब्बी ज्वारी

- पहिला पंधरवडा – पेरणीनंतर १५ दिवसांनी विरळणी करून एका ठिकाणी एक रोप ठेवावे व पेरणीनंतर ३ आठवड्यांने फटीच्या कोळप्याने पहिली कोळपणी करावी.
- दुसरा पंधरवडा – खोडकिडा नियंत्रण– खोडकिडा प्रादुर्भाव दिसल्यास क्युनॉलफॉस २५ ईसी ७५० मीली प्रवाही ५०० लीटर पाणी प्रती हेक्टरी फवारणी करावी. आवश्यकतेनुसार पहिली खुरपणी करावी. पेरणीनंतर ५ आठवड्याने पासेच्या कोळप्याने दुसरी कोळपणी करावी आणि गरज असल्यास पहिले संरक्षित पाणी द्यावे.

वर्ष :२, अंक क्रं. : २१, सप्टेंबर, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

### गहू

- ❖ गव्हासाठी भारी व खोल जमीन निवडून पूर्व मशागत करणे.
- ❖ बागायती पेरणीसाठी फुले समाधान, तपोवन, त्र्यंबक, गोदावरी या जातीमधून हेक्टरसाठी १०० किलो बियाणे घेणे.
- ❖ जिरायती पेरणीसाठी पंचवटी किंवा नेत्रावती या वाणाचे हेक्टरी १२० किलो बियाणे घेणे.

### भात

- ❖ पाणी व्यवस्थापन काढणीपूर्वी १० दिवस अगोदर पाण्याचा निचरा करावा.
- ❖ कापणी पीक निसवल्यावर साधारणपणे २५ ते ३० दिवसांनी ओंबीतील ८० ते ९०% दाणे पक्व झाल्यावर भाताची कापणी करावी. वैभव विळ्याचा वापर यासाठी करावा. यामुळे खोडकिडीचे नियंत्रण होते.
- ❖ फळबाग व्यवस्थापन
- ❖ **डाळिंब –** पक्व फळांची काढणी करणे व खतांची हलकी मात्रा देऊन बाग ताणावर सोडावी.
- ❖ **सिताफळ –** गरज असल्यास पाणी व्यवस्थापन करून पिकलेली फळे काढावीत.
- ❖ **बोर –** गरज असल्यास पाणी व रोग किडींचे नियंत्रण करावे.
- ❖ **आवळा –** पक्व झालेली फळे काढण्यात सुरवात करावी.
- ❖ **अंजीर –** खतांचे नियोजन करणे व मिठा बहार धरणेसाठी पाण्याचे नियोजन करावे.
- ❖ **जांभूळ –** बाग ताणावर सोडावी.
- ❖ **कागदी लिंबू –** हस्त बहाराचे नियोजनासाठी १ टक्का पोटॅशियम नायट्रेटची फवारणी करावी.
- ❖ **मोसंबी –** आंबे बहाराच्या फळांची काढणी करावी.

### भाजीपाला व्यवस्थापन

- ❖ रांगडा कांदा लागवड पहिल्या आठवड्यात पूर्ण करावी.
- ❖ खरीप कांदा लागवडीस नत्र खताचा दुसरा हप्ता द्यावा.
- ❖ खरीप हंगामातील वांगी, मिरची, टोमॅटो काढणी करावी.
- ❖ कोबी व फ्लॉवर पिकाची काढणी करावी.
- ❖ वेलवर्गीय भाजीपाला पिकाची काढणी करावी.
- ❖ भेंडी व गवार पिकाची काढणी करावी.
- ❖ सर्व खरीप भाजीपाला पिकांवरील किड व रोगाचे नियंत्रणाचे उपाय करावेत.
- ❖ दुसऱ्या पंधरवड्यापासून लसूण लागवडीस सुरूवात करावी.
- ❖ रबी हंगामातील कांदा पिकासाठी रोपवाटीका तयार करावी.
- ❖ कांदा बियाण्याची पेरणी करावी.
- ❖ रबी हंगामातील टोमॅटो, फ्लॉवर, कोबी पिकाची रोपवाटीका करावी.
- ❖ वाटाणा पिकाची लागवड दुसऱ्या पंधरवड्यापासून करावी.
- ❖ रबी हंगामामध्ये येणाऱ्या गाजर, मुळा, बिट पिकाची लागवड करावी.

मफुकृवि ई वार्ता
सप्टेंबर २०२२

वर्ष :२, अंक क्र. : २१, सप्टेंबर, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## आले

- खोड पोखरणारी अळीचे नियंत्रण करावे. ही किड मुख्यत: जुलै ते ऑक्टोबर या काळामध्ये आढळते. या किडीची अळी छोटया खोडाला छिद्र करते आणि त्यावर उपजिविका करते. त्यामुळे खोड पिवळे पडून वाळण्यास सुरुवात होते. अळीने पाडलेल्या छिद्रावर जाळीदार भाग दिसतो. या किडीच्या नियंत्रणासाठी एक महिन्याच्या अंतराने निमतेल १ टक्के फवारणी करावी.
- **सुत्रकृमी :** काही भागामध्ये या पिकावर सुत्रकृमीचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. पिकाच्या मुळाभोवती राहून सुईसारख्या अवयवाने मुळातील रस शोषण करतात. त्यामुळे पिकाची वाढ खुंटते व पाने पिवळी पडतात. तसेच यांनी केलेल्या छिद्रातून कंदकुजीस कारणीभूत असलेल्या बुरशींचा सहज शिरकाव होतो. सुत्रकृमीच्या नियंत्रणासाठी लागवडीच्या वेळी ट्रायकोड्र्मा प्लस ५ किलो या प्रमाणात द्यावे. किंवा १८ ते २० क्विं/हे. निंबोळी पेंडीचा वापर करावा. ट्रायकोडर्मा वापरतांना ७ ते १० दिवस सेंद्रीय पदार्थात मुरवुनच जमिनीत घालावे व माती आड करावे.
- हुमणी नियंत्रणासाठी मेटाऱ्हाझीयम या जैविक किडनाशकाचा वापर करावा तसेच भुंगेरे आकर्षित करण्यासाठी एरंड आंबवण सापळयाचा वापर करावा.

## पशुसंवर्धन

- या महिन्याच्या दुसऱ्या आठवडयात आंतरकृमी व बाह्य परोपजीवींचा नायनाट करण्यासाठी बहुप्रभावी जंतनाशक औषध पशुवैद्यकाच्या सहाय्याने दयावे.
- उर्जा व प्रथितेयुक्त पशु आहाराचा समावेश करुन पशु आहार वाढवावा. थंडीची सुरुवात होवून श्वसनाचे आजार संभावण्याची शक्यता असते त्यामुळे विशेषत: लहान वासरांची काळजी घ्यावी.

## अवजारे

ट्रॅक्टरचलित फुले हायड्रो–मेकॅनिकली नियंत्रित फळबागेतील दोन झाडांच्यामधील तण काढणी यंत्र

- रोटरी युनिट दोन झाडांच्या मध्ये व बाहेर हायड्रो–मेकॅनिक यंत्रणेद्वारे सहजपणे कार्य करते.
- फ्रेमच्या योग्य मांडणीमुळे ट्रॅक्टर चालकास यंत्र व्यवस्थित दिसते.
- दोन झाडांच्या मधल्या जागेतील किंवा दोन झाडांच्या ओळीमधील तण काढण्यासाठी उपयुक्त.

प्रकाशक : **डॉ. पी. जी. पाटील**
मा. कुलगुरु आणि संचालक, विस्तार शिक्षण
प्रमुख संपादक : **डॉ. पंडित खर्डे**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र
सहसंपादक : **डॉ. सचिन सदाफळ**
सहाय्यक प्राध्यापक, प्रसारण केंद्र
**श्री. सुनिल राजमाने**
कृषि सहाय्यक, प्रसारण केंद्र
डिझाईनर : **श्री. सिध्दार्थ साळवे**
लिपीक–नि–टंकलेखक, प्रसारण केंद्र

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २४९२/२०२२